# राज्यसेवा मुख्य परीक्षा

# GS : पेपर : १

## २०१२–२०१८

## घटकनिहाय

## प्रश्नपत्रिका विश्लेषण

PRITHVI®
Publication

राज्यसेवा मुख्य परीक्षा
घटकनिहाय प्रश्नपत्रिका विश्लेषण
२०१२–२०१८
GS : पेपर : १

© पृथ्वी पब्लिकेशन

आवृत्ती
एप्रिल २०१९

प्रकाशक
'पृथ्वी पब्लिकेशन', १५३६
सदाशिव पेठ, पुणे. ४११०३०
फोन : ०२० – २४४५१९८६

मुखपृष्ठ मांडणी
नंदकिशोर धपाटे

मांडणी
रूपाली तांबे
अपूर्वा शिंदे
कोमल शेडगे

मुद्रितशोधन
प्रज्ञा सुधाकर भोसले

मुद्रक
सकाळ मिडिया प्रा. लि.

वितरण व्यवस्था
मो. नं. : ८३९०५५४१६१

अभिप्राय, सूचना व मागणीसाठी संपर्क
मो. नं. : ८३९०५५४१६१
publication@prithvi.net.in

मूल्य : ₹ २४०/–

PRITHVI®
Publication

या पुस्तकातील मजकुराचे कायदेशीर हक्क कॉपीराईट कायद्यानुसार प्रकाशकाकडे आहेत. या मजकुराचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यासाठी प्रकाशकाची परवानगी आवश्यक आहे. सदर बाबीचे उल्लंघन झाल्यास कॉपीराईट कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या पुस्तकातील मजकूर व माहिती विविध स्त्रोतांमधून घेण्यात आली आहे. हा मजकूर व माहिती जास्तीत जास्त अचूक ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशकाने केला आहे. तरीदेखील त्यामध्ये कालसापेक्ष व स्थलसापेक्ष बदल होऊ शकतात. या पुस्तकातील मजकूर व माहिती यामुळे होणाऱ्या नुकसानीस प्रकाशक जबाबदार राहणार नाहीत.

# अनुक्रमणिका

## १. इतिहास


१.१ **आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास (१८१८-१८५७)** : आधुनिक शिक्षणाची ओळख - वृत्तपत्रे, रेल्वे, टपाल व तार, उद्योगधंदे, जमीन सुधारणा व सामाजिक- धार्मिक सुधारणा - यांचा समाजावरील परिणाम. ९

१.२ **ब्रिटिश सत्तेची भारतामध्ये स्थापना** : प्रमुख भारतीय सत्तांच्या विरूध्द युद्धे, तैनाती फौज धोरण, खालसा धोरण, १८५७ पर्यंतची ब्रिटिश राज्याची रचना. ९

१.३ **सामाजिक - सांस्कृतिक बदल** : ख्रिश्चन मिशनबरोबरचे संबंध, इंग्रजी शिक्षण व मुद्रणालयाचे आगमन, अधिकृत सामाजिक सुधारणांचे उपाय (१८२८ ते १८५७), सामाजिक - धार्मिक सुधारणांच्या चळवळीः ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, आर्य समाज, शीख तसेच मुस्लिम धर्मीयांतील सुधारणा चळवळी, डिप्रेस्ड क्लासेस मिशन, ब्राम्हणेतर चळवळ व जस्टीस पार्टी. २२

१.४ **सामाजिक व आर्थिक जागृती** : भारतीय राष्ट्रवाद - १८५७ चा उठाव आणि त्यानंतर, इंडियन नॅशनल काँग्रेस (१८८५-१९४७), आझाद हिंद सेना, महत्त्वाच्या व्यक्तिची भूमिका, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतींमधील वृत्तपत्रे व शिक्षण यांची भूमिका. ३६

१.५ **भारतीय राष्ट्रवादाची निर्मिती व विकास** : सामाजिक पार्श्वभूमी, राष्ट्रीय संघटनांची स्थापना, शेतकऱ्यांचे उठाव, इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना, मवाळ गटाची वाढ, जहाल गटाची वाढ, मोर्ले-मिंटो सुधारणा, स्वराज्याची चळवळ, लखनौ करार, माँट-फोर्ड सुधारणा. ४६

१.६ **गांधी युगातील राष्ट्रीय चळवळ** : गांधीजींचे नेतृत्त्व आणि प्रतिकाराचे तत्त्व, गांधीजींच्या लोक चळवळी, असहकार, सविनय कायदेभंग, वैयक्तिक सत्याग्रह, चलेजाव चळवळ, सत्यशोधक समाज, गांधीजी आणि अस्पृश्यता निर्मूलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अस्पृश्यांच्या समस्येबाबतचा दृष्टीकोन, मुस्लीम राजकारण आणि स्वातंत्र्य चळवळ (सर सय्यद अहमद खान व अलिगढ चळवळ, मुस्लीम लीग व अली बंधू, इक्बाल, जिना), संयुक्त पक्ष (युनियनिस्ट पार्टी) व कृषक प्रजा पार्टी, हिंदू महासभेचे राजकारण, साम्यवादी नेते आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ, काँग्रेस समाजवादी पार्टी, राष्ट्रीय चळवळीतील महिला सहभाग, संस्थानातील जनतेची चळवळ, साम्यवादी (डावी) चळवळ - शेतमजुरांची चळवळ - आदिवासींचे बंड, ट्रेड युनियन चळवळ व आदिवासी चळवळ ५३

१.७ **स्वातंत्र्योत्तर भारत** : फाळणीचे परिणाम, संस्थानांचे विलीनीकरण, भाषावार प्रांतरचना, नेहरूंचे अलिप्ततेचे धोरण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ : त्यात सहभागी झालेले महत्त्वाचे राजकीय पक्ष व व्यक्ती, शेजारील राष्ट्रांशी संबंध, आंतरराष्ट्रीय राजकारणामधील भारताची भूमिका, कृषी, उद्योगधंदे, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान यांमधील ८०

| | | |
|---|---|---|
| | प्रगती, इंदिरा गांधीच्या नेतृत्वाचा उदय, बांगला देशाची मुक्ती, इंदिरा गांधींच्या काळातील अलिप्ततावाद, राज्यांतील आघाडीची सरकारे, विद्यार्थ्यांमधील असंतोष, जयप्रकाश नारायण आणि अणीबाणी, पंजाब व आसाममधील दहशतवाद, नक्षलवाद व माओवाद, पर्यावरण चळवळ, महिला चळवळ व वांशिक चळवळ | |
| १.८ | **महाराष्ट्रातील निवडक समाजसुधारक** : त्यांची विचारप्रणाली व कार्य : गोपाळ गणेश आगरकर, महात्मा फुले, मा. गो. रानडे, प्रबोधनकार ठाकरे, महर्षी कर्वे, राजर्षी शाहू महाराज, महर्षि विठ्ठल शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे, विनायक. दा. सावरकर, अण्णा भाऊ साठे, क्रांतिवीर नाना पाटील, लहुजी साळवे, कर्मवीर भाऊराव पाटील. | १०२ |
| १.९ | **महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा (प्राचीन ते आधुनिक)** : प्रायोगिक कला (नृत्य, नाटक, चित्रपट, संगीत व लोककला, लावणी, तमाशा, पोवाडा, भारूड व इतर लोकनृत्ये) दृश्य कला (वास्तुरचना, चित्रकला व वास्तुशिल्प) आणि उत्सव, महाराष्ट्राच्या सामाजिक व मानसिक विकासावरील वाङ्मयाचा प्रभावः भक्ती वाङ्मय, दलित वाङ्मय, नागरी व ग्रामीण वाङ्मय. | १२७ |
| | **२. भूगोल – महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह** | |
| २.१ | **प्राकृतिक भूगोल** : पृथ्वीचे अंतरंग – रचना व प्राकृतिक जडण घडण, भूरूप विकास नियंत्रित करणारे घटक, भूरूपिक चक्रांची संकल्पना – नदीसंबंधी, शुष्क, हिम, समुद्रतटीय चक्र यांच्याशी संबंधित भूरूप. | १३४ |
| २.१. | भारतीय उपखंडाची उत्क्रांती व भूरूपवर्णन, महत्त्वाचे भूरूपकीय प्रदेश – पूरांची समस्या – महाराष्ट्राचा भूरूपकीय तपशील, महाराष्ट्राची भूरूपिक वैशिष्ट्ये, भारताचे त्यांच्या शेजारील राष्ट्राच्या, हिंद महासागराच्या आशियाच्या व जगाच्या संदर्भातील मोक्याचे ठिकाण. | १५१ |
| २.२ | **महाराष्ट्राचा आर्थिक भूगोल** : खनिज व ऊर्जा साधनसंपत्तीः महाराष्ट्रातील खनिज संपतीचे वितरण, महत्त्व व विकास, महाराष्ट्रातील पर्यटन – धार्मिक पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, पर्यावरणभिमूख (इको)पर्यटन व सांस्कृतिक वारसा, महाराष्ट्रातील संरक्षित वने, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने व किल्ले, व्याघ्र प्रकल्प. | १६६ |
| २.३ | **महाराष्ट्राचा मानवी व सामाजिक भूगोल** : जनतेचे स्थलांतर – कारणे व परिणाम, ऊसतोडणी कामगार साधनसंपत्ती व ज्या प्रदेशात स्थलांतर होते त्या प्रदेशावरील स्थलांतराचा परिणाम, महाराष्ट्रातील ग्रामीण वस्त्या, शहरी व ग्रामीण वस्त्यांमधील समस्या – पर्यावरण, गृहनिर्माण, झोपडपट्टी, पाणीपुरवठा व स्वच्छता, शहरी वाहतूक व प्रदुषण. | १८९ |
| २.४ | **पर्यावरणीय भूगोल** : परिस्थितिविज्ञान व पारिस्थितीक व्यवस्था – ऊर्जा प्रवाह, वस्तु चक्र, अन्न श्रृंखला व वेब्ज, पर्यावरणीय अवनती व संवर्धन, जागतिक पारिस्थितिक असमतोल– प्रदुषण व हरितगृह परिणाम, हरितगृह परिणामातील कार्बन डाय ऑक्साईडची व मिथेनची भूमिका, जागतिक तापमानातील वाढ, जैवविविधतेतील घट आणि वनांचा ऱ्हास, पर्यावरण संरक्षणाबाबत कायदे व पर्यावरणीय प्रभावाचे परीक्षण, क्योटो प्रोटोकॉल व कार्बन क्रेडिटस, शहरी कचरा व्यवस्थापन, सागरी संरक्षित क्षेत्र एक व सागरी संरक्षित क्षेत्र दोन | २०७ |

| | | |
|---|---|---|
| २.५ | **जन, भूगोलशास्त्र (महाराष्ट्राच्या संदर्भात)** : स्थलांतराची कारणे व परिणाम, ग्रामीण व शहरी वसाहती – ठिकाण, परिस्थिती प्रकार, आकारमान, मोकळया जागा व भूरूपिकीय स्वरूप, शहरीकरण – प्रक्रिया व समस्या, ग्रामीण – शहरी किनार, शहरी प्रभावाचे क्षेत्र, प्रादेशिक असमतोल | १८९ |
| २.६ | **सुदूर संवेदन** : सुदूर संवेदनाची संकल्पना, भारतीय सुदूर संवेदन उपग्रह कल्पनाचित्र, भारतीय सुदूर संवेदना उपग्रह निर्मिती, एमएसएस बॅन्ड– निळा, हिरवा, लाल व लालसर रंगाच्या जवळचा, आभासी रंग मिश्रक फास्ट कलम कॉम्पझिट (एफसीसी). नैसर्गिक साधन संपत्तीसह सुदूर संवेदनांचा वापर करणे. भौगोलिक माहिती यंत्रणा (जीआयएस) व जागतिक स्थाननिश्चिती यंत्रणा (जीपीएस) सुरू करणे. | २३१ |

## ३. भूगोल व कृषी

| | | |
|---|---|---|
| ३.१ | **कृषी पारिस्थितीकी** : कृषी पारिस्थितिकी व त्याचा मानवाशी, नैसर्गिक साधनसंपत्तीशी संबंध, त्याचे कायमस्वरूपी व्यवस्थापन व संवर्धन, पीक वितरण व उत्पादनाचे घटक म्हणून प्राकृतिक व सामाजिक पर्यावरण, पीक वाढीचे घटक म्हणून हवामान घटक, पर्यावरणीय प्रदूषण व पीके, प्राणी व मानव यांच्या संबंधातील धोके. | २४२ |
| ३.२ | **हवामानः वातावरण** : रचना व संरचना, सौर उत्सर्जन व उष्मा समतोल, हवामानाचे घटक – तापमान, वायुदाब, ग्रहीय व स्थानिक वारे, मान्सून, वायुराशी आणि पुरोभाग व चक्रीवादळे, भारतीय मान्सूनचे तंत्र, पावसाचे पुर्वानुमान, पर्जन्यवृष्टी, चक्रीवादळे, अवर्षण व पूर व हवामान प्रदेश, महाराष्ट्रातील पर्जन्यवृष्टीचे वितरण – अभिक्षेत्रीय व कालिक परिवर्तनशीलता – महाराष्ट्राचे कृषी हवामान क्षेत्रे – अवर्षण व टंचाईची समस्या, अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम, कृषी, उद्योग व घरगुती क्षेत्रातील पाण्याची आवश्यकता, पिण्याच्या पाण्याची समस्या, महाराष्ट्राच्या विविध कृषी हवामान क्षेत्रातील पीक प्रारूप, पीक लागवडीच्या पद्धतीतील बदलांवर उच्च उत्पन्नाच्या व कमी वेळेतल्या विविध प्रकारच्या पिकांचा प्रभाव, बहुविध पीक लागवडीची संकल्पना व आंतर पीक लागवड व त्याचे महत्त्व, सेंद्रिय शेतीची आधुनिक संकल्पना, वर्धनक्षम कृषी. | २५६ |
| ३.३ | **मृदा** : प्राकृतिक, रासायनिक व जैविक गुणधर्म, मृदा तयार होण्याची प्रक्रिया व घटक, खनिजे आणि मातीचे सेंद्रिय घटक आणि मातीची उत्पादकता कायम ठेवण्यामधील त्यांची भूमिका, मातीतील आवश्यक असे वृक्ष लागवडीसाठीचे पोषक घटक आणि इतर लाभदायक घटक आणि समस्याग्रस्त जमिनी व त्या लागवडी योग्य करण्याच्या पद्धती, महाराष्ट्रातील मृदा अपक्षरण व जमीन ओसाड होण्याच्या समस्या, जल विभाजकाच्या आधारे मृद संधारणाचे नियोजन करणे, डोंगराळ, डोंगराच्या पायथ्यावरील व दरीतील जमिनीची धूप व पृष्ठवाह व्यवस्थापन, त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या कार्यपद्धती व घटक. | २७४ |
| ३.४ | **जल व्यवस्थापन** : सद्य परिस्थिती, जल संधारणाच्या पद्धती व महत्त्व, पाण्याच्या गुणवत्तेची मानके, भारतातील नद्यांची आंतर्जोडणी करणे, पावसाचे पाणी साठवून ठेवण्याच्या पारंपरिक व अपारंपरिक पद्धती, भूजल व्यवस्थापन – तांत्रिक व सामाजिक बाबी, कृत्रिम भूजल पुनर्भरणाच्या पद्धती, पाणलोट क्षेत्राची संकल्पना व पाणलोट क्षेत्राचे व्यवस्थापन, कोरडवाहू जमिनीवरील शेती व त्यातील समस्या, पीक उत्पादनासंबंधात पाणी वापराची क्षमता, जल सिंचनाचे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण कमी करण्याच्या उपाययोजना, ठिबक व तुषार जलसिंचन, पाणथळ मृदेचे जलनिस्सारण, कारखान्यातील दूषित पाण्याचा जमीन व पाणी यावर होणारा परिणाम. | २९१ |

# विश्लेषण तक्ता

## विचारलेल्या प्रश्नांची संख्या

| अभ्यासक्रम | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **इतिहास** | | | | | | | |
| १.१-१.२ | १५ | ५ | ७ | ३ | १० | ४ | ३ |
| १.३ | ५ | १२ | १२ | ५ | १० | २ | ७ |
| १.४ | ४ | २ | ४ | ६ | २ | ४ | ८ |
| १.५ | ४ | १ | ९ | २ | ३ | २ | ३ |
| १.६ | ८ | ९ | १२ | २० | ९ | ११ | १२ |
| १.७ | १४ | ११ | ९ | १४ | ९ | ९ | ७ |
| १.८ | ८ | १० | ९ | ९ | ८ | २६ | १५ |
| १.९ | १ | ६ | १ | ४ | ३ | १ | ६ |
| **भूगोल + कृषी** | | | | | | | |
| २.१ | ११ | ५ | ५ | ७ | ३ | २० | ८ |
| २.१ | १० | ८ | ८ | ९ | ११ | - | ८ |
| २.२ | ४ | ८ | ५ | ९ | ११ | १९ | १२ |
| २.३+२.५ | १२ | ७ | १० | ९ | ७ | ६ | ८ |
| २.४ | १० | १८ | १३ | १३ | ६ | ७ | १८ |
| २.६ | ४ | ६ | ६ | ५ | ५ | ५ | ६ |
| ३.१ | ३ | १ | ४ | १४ | १२ | ९ | १३ |
| ३.२ | १३ | ८ | १३ | ७ | २१ | २ | ६ |
| ३.३ | १० | १३ | १० | ६ | ११ | ११ | ७ |
| ३.४ | १२ | १५ | १२ | ७ | ६ | ११ | ५ |

# सामान्य अध्ययन - १
# इतिहास

**: अभ्यासक्रम :**

१.१ **आधुनिक भारताचा विशेषतः महाराष्ट्राचा इतिहास (१८१८–१८५७)** : आधुनिक शिक्षणाची ओळख – वृत्तपत्रे, रेल्वे, टपाल व तार, उद्योगधंदे, जमीन सुधारणा व सामाजिक– धार्मिक सुधारणा – यांचा समाजावरील परिणाम.

१.२ **ब्रिटिश सत्तेची भारतामध्ये स्थापना** : प्रमुख भारतीय सत्तांच्या विरुद्ध युद्धे, तैनाती फौज धोरण, खालसा धोरण, १८५७ पर्यंतची ब्रिटिश राज्याची रचना.

## २०१२

३. **कॉर्नवॉलिसने प्रत्येक जिल्ह्याचे आकारानुसार लहान विभाग करून प्रत्येक विभागावर कोणते हिंदुस्थानी अधिकारी नेमले ?**

१) मुलकी पाटील  २) दरोगा  ३) जिल्हाधिकारी  ४) तलाठी

**उत्तर : २ – 'दरोगा'**

**स्पष्टीकरण –** कॉर्नवॉलिसने पोलीस सुधारणेअंतर्गत ग्रामीण भागत जमीनदारांना असलेले पोलीस अधिकार काढून घेतले. इंग्रज दंड न्यायाधीशांकडे (Magistrates) जिल्ह्यातील पोलीस विभागाचा भार सोपविण्यात आला. जिल्ह्याचे क्षेत्रफळ ४०० वर्गमैल निश्चित करण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यात एक 'दरोगा' व त्याच्या मदतीला पोलीस नियुक्त करण्यात आले.

---

५. **वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा भारतीय भाषा कायदा (१८७८) कोणी मंजूर केला ?**

१) लॉर्ड रिपन  २) लॉर्ड लिटन  ३) लॉर्ड कर्झन  ४) लॉर्ड डफरीन

**उत्तरः २ – लॉर्ड लिटन**

**स्पष्टीकरणः–** १८७६–७७ मधील भीषण दुष्काळ व १८७७ च्या दिल्ली दरबारवर खर्च केलेला प्रचंड पैसा इ. बातम्यांमुळे जनतेत चांगलाच असंतोष निर्माण झाला होता. ब्रिटनच्या मते ह्याचे कारण मेकॉले व मेटकाफचे वृत्तपत्रविषयक उदारतेचे धोरण होते. म्हणूनच त्याने भारतीय भाषांमधून निघणाऱ्या वृत्तपत्रांवर अधिक नियंत्रण लादण्याचा प्रयत्न केला.

---

६. **इ.स. १८०० मध्ये कोणी हिंदी लोकांसाठी कलकत्ता येथे फोर्ट विलियम महाविद्यालयाची स्थापना केली ?**

१) लॉर्ड मेकॉले  २) लॉर्ड बेंटिक  ३) लॉर्ड वेलस्ली  ४) लॉर्ड डलहौसी

**उत्तरः ३ – लॉर्ड वेलस्ली**

**स्पष्टीकरणः–** १७८१ मध्ये वॉरेन हेस्टिंग्ज कलकत्त्याला एक मदरसा स्थापन केली. १७९१ मध्ये बनारसचा ब्रिटिश रेसिडंट डंकन ह्याने बनारस येथे संस्कृत महाविद्यालय सुरू केले. शिक्षणाविषयी उदार धोरण ठेवणाऱ्या लॉर्ड वेलस्लीने कंपनीच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठी कलकत्ता येथे इ. स. १८०० मध्ये फोर्ट विल्यम कॉलेजची स्थापना केली, पण कंपनीच्या संचालकांच्या आदेशावरून हे कॉलेज १८०२ मध्ये बंद करण्यात आले.

**९. ब्रिटिश सरकारने जमीन महसूल पद्धतीत कोणते बदल केले ?**

**अ) ब्रिटिशांनी जमिनीची मोजणी करून जमीन महसूल निश्चित केला.**

**ब) ब्रिटिशांनी शेतकऱ्यांना जमीन महसूल रोखीने भरणे सक्तीचे केले.**

**क) वेळेत जमीन महसूल न भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्याचा कायदा केला.**

**ड) सर्व शेतकऱ्यांनी जमीन महसूल वेळेत भरणे आवश्यक केले.**

**वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?**

१) अ आणि ब फक्त २) ब आणि क फक्त ३) अ आणि क फक्त ४) वरील सर्व

**उत्तर: ४ – वरील सर्व**

**स्पष्टीकरण:–** इंग्रजांनी भारताच्या विजयाचा आर्थिक लाभांसाठी जास्तीत जास्त उपयोग करून घेतला. ब्रिटिशांच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधांनी कंपनीला आयात–निर्यातीवरील कर वाढवण्यास प्रतिबंध केला. त्यामुळे कंपनीचे उत्पन्नाचे मुख्य साधन शेतीवरील कर हे होते. त्यानुसार ब्रिटिश सरकारने जमीन मोजणी करण्यास सुरुवात केली व महसूल निश्चित केला. भूमीकर वेळच्या वेळी न दिल्यास सरकार जमीनदाराची किंवा रयतेची जमीन जप्त करून ती शहरातील व्यापाऱ्यांना विकून टाकी.

---

**११. गव्हर्नर जनरल विल्यम बेंटिकने कोणत्या सुधारणा केल्या ?**

**अ) राज्यकारभारातील अनावश्यक पदे रद्द केली.** **ब) कंपनीच्या नोकरांचे पगार कमी करण्यात आले.**

**क) भत्ता देणे बंद करण्यात आले.** **ड) भारताला स्वातंत्र्य देण्याचे घोषित केले.**

१) अ,ब आणि क २) अ आणि ड फक्त ३) अ, ब आणि ड ४) वरील सर्व

**उत्तर: १ – अ, ब आणि क**

**स्पष्टीकरण:–** ब्रह्मदेश बरोबरच्या युद्धाने कंपनीच्या खजिन्यावर ताण पडला होता. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होता. इंग्लंड सरकारने बेंटिकला खर्च कमी करण्याचे आदेश दिले. त्यासाठी बेंटिकने राज्यकारभारातील अनावश्यक पदे रद्द केली. लष्करी व बिनलष्करी अशा दोन समित्या नियुक्त केल्या. कंपनीच्या संचालकांच्या विशेष आदेशानुसार सैनिकांचा भत्ता कमी करण्यात आला. बेंटिकच्या सुधारणांमुळे भारतात इंग्रजी सत्ता अधिकच मबजुत झाली. त्याचे अंतिम ध्येय भारतात साम्राज्यविस्तार करणे हेच होते, भारताला स्वातंत्र्य देणे नव्हे.

---

**१२. लॉर्ड डलहौसीने लष्कराच्या विकेंद्रीकरणासाठी कोणत्या सुधारणा केल्या ? त्याबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?**

१) बंगालमधील सैन्य मेरठ येथे नेले. २) कलकत्ता येथे असलेली युद्ध सामग्री मेरठ येथे नेली.

३) सिमला येथे भारताचे प्रमुख केंद्र उभारले. ४) भारतीय लष्करावर विश्वास ठेवला.

**उत्तर: ४ – भारतीय लष्करावर विश्वास ठेवला.**

**स्पष्टीकरण:–** डलहौसीने केलेल्या साम्राज्यविस्तारामुळे इंग्रजी राज्याची सीमा बंगालपासून थेट वायव्य सीमेपर्यंत पसरली. त्याने बंगाल तोफखान्याचे केंद्रीय कार्यालय कलकत्त्याहून मेरठ येथे नेले, तसेच लष्कराचे मुख्य कार्यालय सिमला येथे ठेवले. १८५६ मध्ये भारतीय सैन्यात भारतीयांची संख्या २३८००० आणि इंग्रजांची संख्या ४५००० होती. डलहौसीने इंग्रजांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला. त्याच्या मते इंग्रज सैन्य हीच आमची खरी शक्ती.

---

**१४. ब्रिटिशांच्या अर्थनीतिमुळे शेतीवरील ताण कसा वाढला ?**

**अ) भारतीय कुटिरोद्योगातून लक्षावधी कारागीर बेकार झाले.**

**ब) शेतीतून आवश्यक तेवढे उत्पादन होत नव्हते.**

**क) शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नव्हते.**

**ड) शेतकऱ्यांना आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करणे अशक्य झाले.**

**वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?**

१) अ आणि ब २) ब आणि क ३) अ फक्त ४) ड फक्त

**उत्तर: ३ – अ फक्त**

**स्पष्टीकरण:–** ब्रिटिशांच्या भूमीकर पद्धतींचा विशेषकरून अत्याधिक करांचा तसेच नव्या प्रशासकीय व न्यायालयीन व्यवस्थेचा परिणाम म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था अस्ताव्यस्त होऊन गेली. खेड्यांची जुनी राजकीय, सामाजिक, आर्थिक जडणघडण राहिली नाही. भारतातील कुटिरोद्योग जवळजवळ संपुष्टात आले. ज्यामुळे लक्षावधी कारागीर बेकार झाले. शेतीतून नगदी पिकांचे जास्तीत जास्त उत्पादन घेतले होते. शेतकऱ्यांना शेती करणे परवडणारे असले, तरी करांच्या बोझामुळे ते डबघाईला आले होते.

---

**१८. रणजितसिंहाला लाहोरवर आपली सत्ता प्रस्थापित करण्यास झमानशाहने संमती का दिली ?**

१) झमानशहा रणजितसिंहाचा मित्र होता.

२) झमानशाहने रणजितसिंहाला लाहोर बक्षीस दिले.

३) रणजितसिंहाने तोफा झमानशाहकडे पाठविल्या होत्या म्हणून.

४) रणजितसिंह झमानशाहच्या मर्जीतील होता.

**उत्तर:– ३ – रणजितसिंहाने तोफा झमानशाहकडे पाठविल्या होत्या म्हणून**

**स्पष्टीकरण:–** १७९८ मध्ये झमानशहाने पंजाबवर आक्रमण केले. परत जाताना त्याच्या काही तोफा चिनाब नदीत पडल्या. त्या तोफा काढून रणजितसिंहाने झमानशाहकडे पाठवल्या. या कार्याबद्दल झमानशहाने रणजितसिंहाला लाहोरवर शासन करण्याची अनुमती दिली.

---

**२०. मीर जाफर यास नवाब पदावरून दूर करण्याचे लॉर्ड क्लाईव्हने का ठरविले ?**

१) लॉर्ड क्लाईव्हच्या मागण्या त्याने पूर्ण केल्या नाहीत. २) कंपनीने केलेली पैशाची मागणी तो पूर्ण करू शकला नाही.

३) तो लॉर्ड क्लाईव्हचे ऐकत नव्हता. ४) तो राज्यकारभार योग्य पद्धतीने चालवीत नव्हता.

**उत्तर : २ – कंपनीने केलेली पैशाची मागणी तो पूर्ण करू शकला नाही.**

**स्पष्टीकरण:–** कंपनीचे लष्कर दिवसेंदिवस वाढत होते. त्यासाठी पैशाची नितांत गरज होती. मीर जाफरने कंपनीला मासिक एक लक्ष रु. देण्याचे कबूल केले होते. याशिवाय, नवाब मीर जाफरने काही प्रदेश कंपनीला दिला. पण त्याचे उत्पन्न फारसे नव्हते. मीर जाफर लॉर्ड क्लाईव्हच्या हातातील खेळणे असला, तरी कंपनीची पैशाची मागणी पूर्ण न करू शकल्याने तो पदभ्रष्ट झाला.

---

**२२. ब्रिटिशांनी भारतीय शेतकऱ्यांवर नगदी पिकांचे उत्पादन घेण्याची सक्ती करण्याचा प्रयत्न का केला ?**

१) भाारतीय लोकांचा आर्थिक फायदा व्हावा. २) भारतीय प्रगतीत हातभार लागावा

३) ब्रिटिशांना याद्वारे प्रचंड नफा मिळणार होता. ४) शेतकऱ्यांना फार मोठा नफा मिळणार होता.

**उत्तर: ३ – ब्रिटिशांना याद्वारे प्रचंड नफा होणार होता.**

**स्पष्टीकरण:** – भारताची आर्थिक पिळवणूक करणे हाच ब्रिटिशांचा भारतातील साम्राज्यविस्तारामागील प्रमुख उद्देश होता. पारंपरिक पिकांऐवजी नीळ, तंबाखू, कॉफी यांसारखी नगदी पिके घेऊन जास्तीत जास्त पैसे कमवणे हेच ब्रिटिश सरकारला साध्य करायचे होते. भारतीयांची पिळवणूक करताना जनतेच्या हिताचा ब्रिटिश सरकारने कधीही विचार केला नाही.

२३. **ब्रिटिशांनी भारताच्या औद्योगिक विकासात अडथळे का आणले ?**

१) ब्रिटिशांना फक्त स्वत:चा फायदा साध्य करावयाचा होता.

२) भारतीयांना औद्योगिक विकास म्हणजे काय हे माहीत नव्हते.

३) भारतीय मोठ्या प्रमाणावर शिकलेले नसल्याने ते औद्योगिक प्रगती ते करू शकणार नाहीत असे ब्रिटिशांना वाटत होते.

४) भारतीय औद्योगिक विकासाबाबत उत्सुक नव्हते.

**उत्तर: – १ – ब्रिटिशांना फक्त स्वत:चा फायदा साध्य करायचा होता.**

**स्पष्टीकरण: –** भारतात प्राचीन काळापासून उद्योग व्यवसाय अस्तित्वात होते. युरोपियनांचे भारतातील आगमन भारतातील तयार माल घेण्यासाठीच झाले होते. मात्र भारतात कुटीरोद्योग होते. काळाच्या ओघात कुटीरोद्योग नष्ट होऊन उद्योग व्यवसाय सुरू होऊ लागले. मात्र, ब्रिटिशांनी स्वार्थी वृत्तीने त्यात अडथळे आणण्यास सुरुवात केली.

---

२५. **ईस्ट इंडिया कंपनीच्या अंमलाखाली भारतातील पारंपरिक उद्योगधंद्याचा ऱ्हास झाला कारण ,**

**अ) भारतीय कामगाराकडे आवश्यक ते तांत्रिक प्राविण्य नव्हते.**

**ब) भारतीयांनी शेतीवर लक्ष केंद्रित केले होते.**

**क) भारतीय माल ब्रिटिश मालाशी स्पर्धा करू शकला नाही.**

**ड) वरीलपैकी कोणतेही नाही.**

**वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?**

१) अ, ब आणि क　　२) ब आणि क　　३) अ आणि ब　　४) फक्त क

**उत्तर : ४ – फक्त क**

**स्पष्टीकरण: –** मध्ययुगीन काळापासून भारतात प्रामुख्याने कुटीरोद्योग अस्तित्त्वात होते. युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रांचा वापर अतिप्रमाणात वाढला. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनाच्या दर्जात वाढ झाली. याऊलट, भारतीय उत्पादनांची किंमत तशीच राहून दर्जाही सुधारला नाही. त्यामुळे भारतीय माल ब्रिटिश मालाच्या स्पर्धेत मागे पडला.

---

२६. **एलफिन्स्टनला जमीन महसुलाच्या संदर्भात महाराष्ट्रात कोणती पद्धत लागू करावयाची होती ?**

१) कायमधारा पद्धत　　२) रयतवारी पद्धत　　३) महालवारी पद्धत　　४) मौजेवारी पद्धत

**उत्तर : ४ – मौजेवारी पद्धत**

**स्पष्टीकरण: –** एलफिन्स्टन १८१९–२७ या काळात मुंबईचा गव्हर्नर होता. पेशव्याकडून मिळवलेल्या प्रदेशासंबंधी त्याने १८१९ मध्ये एक विस्तृत अहवाल दिला. ज्यात मौजेवारी पद्धत लागू करण्यासंबंधीचे आदेश होते. परंतु महाराष्ट्रात रयतवारी पद्धतींचा अवलंब केला गेला.

---

२७. **चंद्रनगरचा प्रशासक या नात्याने ......... याने आपल्या दूरदृष्टीचा व प्रशासकीय कौशल्याचा परिचय दिला.**

१) वेरेल्स्ट　　२) लॉरेन्स　　३) सॉण्डर्स　　४) डुप्ले

**उत्तर : ४ – डुप्ले**

**स्पष्टीकरण: –** चंद्रनगरचा प्रशासक या नात्याने डुप्लेने आपल्या दूरदृष्टीचा व प्रशासकीय कौशल्याचा उत्तम परिचय दिला. त्याने आपले खासगी भांडवल व्यापासासाठी लावले. सहकाऱ्यांना कर्ज दिले आणि चंद्रनगरला व्यापार करण्यासाठी भारतीय व्यापाऱ्यांना प्रोत्साहन दिले.

---

५२. **बॉम्बे एज्युकेशन सोसायटीचा मुख्य हेतू काय होता ?**

**अ) गरीब हिंदू मुलांना शिक्षण देणे.**

**ब) गरीब युरोपियन मुलांना शिक्षण देणे.**